REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि श्रमिक

घोडके निशांत इंद्रकुमार
संशोधक विद्यार्थी, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे .

**प्रास्ताविक :-**



स्वातंत्र्यानंतर दुष्काळाचा पहिला तीव्र तडाखा १९७२ ला जाणवला अन्नधान्याची वैरणीची चणचण भासली व रिकाम्या हाताला काम देणे आत्यआवश्यक ठरले पावसाच्या पाण्यावर आधारलेली शेती हा निसर्गाशी खेळलेला जुगार ठरली व दुष्काळातील वाढ तीव्रपणेजाणवत गेली ग्रामीण भागातून शेतकऱ्यांचे आणि शेतमजुरांचे शहरी भागाकडे पोटापाण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर होऊ लागले त्यामुळे आपतकालीन स्थितीत रिकाम्या हाताला कामाची हमी देणे गरजेचे ठरले भारतीय संविधानाच्या अनुछेद ४१ मध्ये काम करण्याच्या हक्का संबंधी तत्वावर भर दिलेला आहे.देशात विकासाच्या अनेक योजना आल्या परंतु कामाची हमी देणारी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या सर्वापासून वेगळी आहे

रोजगार हमी योजना वी.स.पागे यांनी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील विसापूर येथे सन १९६९ मध्ये पहिला प्रयोग केला.ग्रामीण भागामध्ये रोजगार उपलब्ध होयील व उत्पादक मालमत्ता वाढेल या हेतूने १ ऑक्टोबर १९७८ रोजी भारताचे तात्कालीन राष्ट्रपती यांची अनुमती मिळाली व २६ जानेवारी १९७९ या गणराज्य दिनापासून त्याची अंमलबजावणी सुरु झाली जेंव्हा इतर श्रोतातातून रोजगार मिळणार नाही.तेंव्हा महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम १९७७ अंतर्गत रोजगाराची हमी देण्याची संकल्पना निश्चित करण्यात आली.हा रोजगार अंग मेहनतीची अकुशल कामे करण्यासाठी तयार असणाऱ्या व्यक्तींनाच देय आहे.राज्याचा रोहयो कायदा २००६ मधील कलम ७(२)(११) मध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले आहे कि,शेतीच्या नेहमीच्या कामावर प्रतिकूल परिणाम होणार नाही व त्यातून उत्पादक कामे हाती घेऊन स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण होऊन शेतीवर रोजगाराच्या कायम संधी उपलब्ध होतील या दृष्टीने शेतीचे हंगामी स्वरूप बदलून बिगर शेती हंगामात रोजगार उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा अर्थ :-**

ग्रामीण भागाचा सुयोग्य विकास करण्याच्या दृष्टीने उपलब्ध मानवी साधन संपत्ती द्वारे ग्रामीण भागातील टिकावू सामुहिक मालमत्ता निर्माण करीत असताना ग्रामीण भागात राहणाऱ्या व अंग मेहनतीची अकुशल कामे करणाऱ्या श्रमिकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने सुरु केलेल्या योजनेला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे संबोधले ओह

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

लोकशाही शासन प्रणालीत ग्रामीण विकासयातील मनरेगाची भूमिका तपासण्यासाठी प्रस्तुत अभ्यासात पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) म.गा.राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत श्रमिक सर्व समावेशकता व श्रमिकांना मिळणाऱ्या सोयी सवलतीचा अभ्यास करणे.
२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे शेतकरी व भूमिहीन श्रमिक यांच्यात झालेल्या बदलत्यास्थितीचा अभ्यास करणे.
३) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत काम करणाऱ्या श्रमिकांच्या समस्यांचा अभ्यास करणे

**गृहीतके :-**

१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी हि सर्वसमावेशक योजना आहे.

२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे शेतकरी व श्रमिक असून त्यांच्या आर्थिक स्थितीत बदल झाला आहे.

३) राष्ट्रीय ग्रामीण रोजग्र हमी योजने अंतर्गत श्रमिकांना समस्या आहे.

**संशोधन पद्धती :-**

लेख लिहिण्यासाठी द्वितीय सामग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे.या मध्ये प्रामुख्याने विविध संदर्भग्रंथ मासिके,अहवाल,शासनाचे अहवाल,वर्तमान पत्रातील संपादकीय लेख,इंटरनेट इ.साधनाचा आधार घेण्यात आलेला आहे.

**१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व समावेशकता व श्रमिकांना मिळणाऱ्या सोयी सवलतीचा अभ्यास करणे.**

भारतीय हिंदू संस्कृतीत स्रियांना अजाती,अनु.जमातींना गुलामीत ठेवले होते.जातीयता फार प्रखर होती रोजगार हमी योजना अमलात येताच सामाजिक पाश थोडेसेढिले झाले घोळक्याने श्रमिक कामावर एकत्र जाऊलागले ग्रामीण रोजगार हमी योजना हि सर्व समावेशक योजना असल्याचे खालील कोष्टका वरून समजते.

**मनरेगा योजने मध्ये महिला,अ.जाती.अ.जमातीचे प्रमाण**

| अ.न | तपशील | सन २०१५/१६ | सन २०१६/१७ |
|---|---|---|---|
| १ | महिला | ४४.५२ % | ४४.८६ % |
| २ | अनुसूचित जमाती | १९.३० % | २०.२४ % |
| ३ | अनुसूचित जाती | ९.११ % | ८.८२ % |

वरील तक्ता वरून असे निदर्शनास येते कि,या योजने अंतर्गत सन २०१५/१६ या वर्षामध्ये योजने अंतर्गत निर्माण झालेल्या एकूण मनुष्य दिवस निर्मितीमध्ये अनुसूचित जातीचे प्रमाण९.१% तर अनुसूचित जमातीचे प्रमाण १९.३०%तर महिलांचे प्रणाम ४४.५२% इतके आहे.राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेमध्ये अ.जाती,अ.जमाती स्री-पुरुष असा भेदभाव न करता समान मजुरीचे दर व सर्वाना योजने मध्ये सामाऊन घेतल्याचे पहावयास मिळते.तर सन २०१६/१७ या आर्थिक वर्षामध्ये ४४.८६% महिलांचे असून अनुसूचित जमातीचे प्रमाण २०.२४% आहे.व अनुसूचित जातीचे प्रमाण ८.८२%आहे.

**श्रमिकांना मिळणाऱ्या सोयी सवलती :-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत श्रमिकांना सोयी सवलती पुरवण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहेसदर सवलती श्रमिकांना मिळतील याची दक्षता संबंधित कार्यालयाने घ्यावयाची आहे.

१)पिण्याचे पाणी,२) निवाऱ्याची व्यवस्था,३) हत्यार भाडे धार लावणे खर्च,४) प्रथोमपचार व्यवस्था,५) दायीची व्यवस्था,६) खडी फोडणाऱ्या श्रमिकांना चष्मे पुरवणे,७) सानुग्रह अनुदान -

**१) अपघात औषध उपचार सानुग्रह अनुदान**

अ अपघात मृत्यू सानुग्रह अनुदान- ५०,०००/-

ब प्रसूती सानुग्रह अनुदान- १५ दिवस मजुरी इतकी रक्कम,पगारी रजा

क कुटुंब नियोजन शस्रक्रिया अनुदान

८) अल्पवयीन मुलांना वैदयकिय मदत,९) छावण्यांची व्यवस्था अशा अनेक सुविधा मनरेगा अंतर्गत पुरवण्यात येतात

परंतु या सर्व सुविधा बहुतांशी मिळत नसल्याचे जाणवत आहेत्याकरिता श्रमिकांनी वरीष्ठाकडे अर्ज करणे व संघटन शक्तीच्या माध्यमातून आवाज उठवणे गरजेचे आहे.

**२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे शेतकरी व भूमिहीन श्रामीक यांच्यात झालेल्या बदलत्या स्थितीचा अभ्यास करणे:-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत ग्रामीण भागामध्ये उत्पादक आणि टिकाऊ मालमत्ता उभारण्याचे काम या योजनेच्या उद्दिष्टाप्रमाणे झाल्याने त्यामध्ये ग्रामीण रस्ते,पूरनियंत्रक कामे,जलसंवर्धन दुष्काळ निवारण,सुक्षम सिंचन सुविधा,परंपरागत साठ्याची

पुनरचना,भू विकास राजीव गांधी केंद्र ग्रामीण स्वच्छता, अंगणवाडी खेळ मैदान अनेक महत्वाच्या मालमत्ता ग्रामीण भागामध्ये निर्माण केल्या आहेत.श्रमिकांच्या खात्यावर मजुरी वर्ग करणेसाठी online पद्धतीचा अवलंब,बायोमेट्रिक पद्धत,ई मस्टर शेती पूरक विहिरी,फळबाग लागवड असे श्रमिकांच्या व शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे कामे केल्याचे दिसून येतातसन २०१५/१६ व २०१६/१७ या वर्षात टिकाऊ मालमत्ता उभारणी नैसर्गिक स्रोतांचे नियोजन,कृषी सलग्न क्षेत्रात अधिक महत्वाची कामे केली आहेत.त्यामुळे ग्रामीण भागामध्ये जलस्रोतांमध्ये वाढ होऊन शेतीच्या पिकरचनेत बदल होऊन जिरायती पिकांएवजी बागायती उत्पादक स्वरुपाची पिके घेण्याचे प्रणाम वाढलेले दिसून येते परिणामी त्यांच्या उत्पादनात भ पडून विकास झाल्याचे पहावयास मिळते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीन रोजगार हमी योजनेच्या अमलबजावणी मुळे हि शेतीसाठी मजूर उपलब्ध होत नसल्याचा काही अभ्यासकाचे व संशोधानाचा दावा आहे.परंतु तो तितकासा खरा नाही.महात्मा गांधी रोजगार हमी मजुरांना किमान वेतन दराने वर्षभरात १०० दिवसाचा रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देत आहे.व या योजनेच्या अंबलबजावणीमुळे ग्रामीण भागातमनरेगा योजनेमुळे शेती क्षेत्रात इतर क्षेत्रात मजुरीच्या दरामध्ये वाढ झाल्याचे आढळून आले आहेपरिणामी शेतकरी व श्रमिकाच्या उत्पादनात वाढ होऊन त्यांचा आर्थिक विकास झाल्याचे पहावयास मिळते ते खालील तक्त्या वरून पहावयास मिळते.

| अ.न | कामगिरी | सन २०१५/१६ | सन २०१६/१७ |
|---|---|---|---|
| १ | सरासरी प्रती मजुरी | १५४.४ | १६१.५ |
| २ | हमी घेतलेली कामे | १२४ लाख | ११४ लाख |
| ३ | पूर्ण सा कामे | ३५.९ लाख | ३६.८ लाख |
| ४ | कृषी कामांचा वाटा | - | ७०% |
| ५ | केंद्रीय अर्थ संकल्पीय | ३३.७० कोटी | ४७.२४१ कोटी |
| ६ | प्रत्यक्ष एकूण खर्च | ४३.९१३ कोटी | ४७.२४१ कोटी |
| ७ | मजुरी खर्चाचा वाटा | ७०.३ % | ७१.९% |
| ८ | साधन सामग्री वाटा | २५.८% | २५% |

संदर्भ :- दीपस्तंभ अर्थशस्र पान क्र.९५

वरील तक्त्यावरून असे दिसून येतो कि, मनरेगा अंतर्गत २५ ते ३० लाख कामे हाती घेतली होती २०१६/१७ मध्ये हा आकडा ४८ लाखांवर गेलेला आहे.२०१५/१६ मध्ये कृषी कामांचा वाटा ५०% होता टर २०१६/१७ मध्ये ७०%झाला आहे.सन २०१६/१७ची अर्थसंकल्पीय तरतूद ३८,५०० कोटी असून २०१६/१७ या वर्षाच्या अर्थ संकल्पात शेतकऱ्यासाठी पर्जन्य प्रदेशात ५ लक्ष शेततळी मनरेगा अंतर्गत उभारण्याचे ठरवले आहेशेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्न केला जात आहेसन २०१५/१६ मध्ये मजुरी वरील खर्चाचा वाटा ७०.३ %आहेत.सन २०१६/१७ मध्ये मजुरी खर्चा वाटा ७१.९% वर गेल्याचे दिसून येते म्हणजे मनरेगा अंतर्गत झालेली कामे व त्यावरील खर्च श्रमिक व शेतकरी यांच्या उत्पादन पातळी वाढून त्यांचा विकास होऊन जीवनमान सुधारले आहेअसे म्हणता येईल

### ३ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत काम करणाऱ्या श्रमिकांच्या समस्यांना अभ्यास करणे.

मनारेगा योजनेवर काम करत असताना अडचणी येणार नाहीत.श्रमिकांना अधिका अधिक सुरक्षा व लाभ मिळावा तसेच गावचा विकास व्हावा तसी तजवीज मनरेगाच्या नियोजन अमलबजावणी मध्ये केली आहे.पण तरीही मनरेगावर प्रत्यक्ष काम करताना अमलबजावणी यंत्रणा व अधिकारी यांचे कडून अडचणी आल्याचे निदर्शनास येते

#### १) सोयी सवलती संदर्भात :-

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमातील तरतुदी प्रमाणे पान क्र.३ वरील सर्व सुविधा श्रमिकांना देणे बंधनकारक आहे.परंतु ह्या सर्व सोयी सुविधा प्रत्यक्षात श्रमिकांना मिळत नसलेचे जाणवत आहेकेवळ पिण्यासाठी पाणी हि सुविधा प्रत्यक्षात मिळते.

**२) बेरोजगार भत्ता :-**

शासनाने मागेल त्याला काम पुरवण्याची हमी घेतली असून जर निश्चित मुदतीच्या आत शासनाने काम उपलब्ध करून दिले नाही रोहयो कायदा कलम १९७७ ३(ड) प्रमाणे बेरोजगार भत्ता देण्याची तरतूद आहे.बेरोजगार भत्ता सुयोग्य अमलबजावणी करिता प्रशासनावर धाक म्हणू एक प्रकारे दंडासारखी बेरोजगार भत्याची तरतूद आहे.परंतु प्रत्यक्षात एकही श्रमिकाला बेरोजगार भत्ता मिळाल्याचे दिसून येत नाही म्हणजे याचा अर्थ असा नव्हे कि श्रमिकांनी कामाची मागणी केली असता त्याला वेळेवर १५ दिवसाच्या आता काम मिळाले आहे.अधिकाऱ्याकडून श्रमिकांची फसवणूक होते श्रमिकालानमुना न ४ भरून कामाची मागणी केल्यानंतर न क्र मागणीची पोहच दिली जात नाही.म्हणजे मागणीबाबत श्रमिकाकडे कोणतीही पुरावा दिला जात नाही.म्हणून बेरोजगार भत्ता मिळत नाही.

३) श्रमिकांना त्याचे वेतन थेट बँक मध्ये जमा केले जाते.परंतु नजर चुकीने जर ते चुकीच्या खात्यात गेले तर वर्ष वर्ष त्यांना त्यांची मजुरीची रक्कम मिळत नाही.त्या करीता विलंब होतो.

**४ वैयक्तिक लाभाच्या योजने संदर्भात :-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर अकुशल स्वरूपाचे काम करणाऱ्या श्रमिकांना योजनेचा लाभ मिळालेला नाही.जे श्रमिकप्रत्येक्षात अकुशल स्वरूपाचे कामे करतात .अशाच श्रमिकांना व्यक्तीक लाभासाठी प्राधान्य देण्यात यावे.

**५ मजुरीचे दर :-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केंद्र शासनाला मजुरीचे दर निश्चित करण्याचे अधिकारी आहेत.त्यानुसार केंद्र शासनाने खालील प्रमाणे मजुरीचे दर निश्चित केलेले आहेत.

| अ.न | वर्ष | दर |
|---|---|---|
| १ | २०१६/१७ | १९२ |
| २ | २०१७/१८ | २०१ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि,केंद्र शासनाने सन २०१६/१७ साठी १९२ रुपये किमान मजुरीचे दर निश्चीत केले आहेत.तर २०१७/१८ करिता २०१ रुपये वेतनदर निश्चित करण्यात आलेला आहे.परंतु किमान मजुरीचा दर व जीवनावश्यक खर्चाशी संबंध असला पाहिजे त्याचा अन्न,वस्त्र,निवारा,औषधे,शिक्षण सध्याचा महागाईच्या उच्चांक पहाता.श्रमिकांच्या गरजा पूर्ण होत नाही.अभय बंग यांचे मते इंडियन कॉन्सील ऑफ मेडिकल रिसर्च (ए.आय.सी.एम.आर.) वैद्यकीय संशोधनातील संस्थेच्या अहवालातील कॉलरीज लक्षात घेता.किमान वेतनाचा दर निश्चित करणे आवश्यक आहे.योजनेची अंमलबजावणी योग्य होणे करिता श्रमिकांनी संघटन शक्ती उभी करून प्रशासनावर दबाव आंत येऊ शकतो.व त्यामुळे मजुरांची कामावर जास्त उपस्तिथी कौतुकाचा प्रश्न न राहता गुणवत्ता पूर्ण कामे होतील

**निष्कर्ष :-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना हि दुष्काळी परिस्थितीत श्रमिकांना उपजीविकेची हमी देतेभारतीय संविधानातील मार्गदर्शन तत्वाप्रमेण सर्वजाती धर्मांना समावून घेऊन स्त्रीपुरुष समान कामासाठी समान वेतन देते.एकूण श्रमिकां पैकी १९.३०% अनुसूचित जमातीचा सहभाग आहेतर अनुसूचित जातीचा ९.१९% सहभाग आहे.मनरेगा योजेनमुळे टिकाऊ मालमत्ता निर्मिती नैसर्गिक जलस्त्रोत पुनर्जीवन कृषी क्षेत्रात देखील अनेक प्रकारची कामे झाल्यामुळे पीकरचनेत बदल होऊन उत्पन्नात वाढ झाली आहे.परिणामी श्रमिकांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे जीवनमान सुधारले आहे

मनरेगा योजने अंतर्गत श्रमिकांना अनेक सोयी सुविधा देऊ केल्या आहेत.परंतु त्या श्रमिकांना दिला जात नाहीत. मनरेगा मुळे आर्थिक प्रगती होऊन शैक्षणिक विकास झाला असून पूर्ण देशामध्ये हि योजना राबवली जात आहे१९७२ व आजची परिस्थिती पाहता जलसिंचनाची कामे कमिप्रमाणात झालेली असून रस्त्यान सारखी इतर कामे मोठ्याप्रमाणात झालेली आहेत

## संदर्भ साहित्य

१ महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०१६ पं क्र ७
२ अर्थशस्र दीपस्तंभ पं क्र ९४
३ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना–डॉ.अर्जुन चिखले
४ महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम १९७७
५ १६ महाराष्ट्र सिंचन परिषद २०१५